Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Kolhapur Divisional Board, Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक व उच्च उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर -४१६००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

<u>महत्वाचे/परीक्षा प्राधान्य</u>

क्र. कोविमं/उमा. गोप/उ.प.तपासणी/ ३२५०
कोल्हापूर-०४
दिनांक : १५/०९/२०२५

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त क. महाविद्यालये,
जिल्हा सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रु-मार्च २०२६ च्या परीक्षेकरिता परीक्षक/नियामक नेमणुक तसेच प्रात्यक्षिक परीक्षेसंदर्भात शिक्षक माहिती पाठविणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) फेब्रुवारी/ मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणा-या परीक्षेसाठी उत्तरपत्रिकांची तपासणी कामासाठी परीक्षक / नियामक नेमणूकीच्या अनुषंगाने आपणाकडून प्राप्त झालेल्या शिक्षक माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेली शिक्षक माहिती यादी या पत्रासोबत **दिनांक १८/०९/२०२५ रोजी वितरण केंद्रावर हस्तपोच** आपणास देण्यात येत आहे. त्यातील माहितीची पडताळणी करण्यासंदर्भात आवश्यक त्या सूचना खालीलप्रमाणे :

1. यादीतील शिक्षकांचे संपूर्ण नांव (इंग्रजी स्पेलींगसह) त्याचबरोबर शिकवीत असलेले विषय आणि माध्यम इ. सर्व माहिती बरोबर आहे का याची खात्री करावी.
2. **आपल्या क. महाविद्यालयात कार्यरत असलेल्या सर्व विषय शिक्षकांची नांवे सोबतच्या यादीत समाविष्ठ असणे आवश्यक असल्याने यासंदर्भात क. महाविद्यालयप्रमुख म्हणून सर्वस्वी प्राचार्य जबाबदार रहातील. यादीमध्य एखाद्या शिक्षकाचे नाव समाविष्ठ नसलेस ते समाविष्ठ करावे. तसेच तात्पुरत्या/तासिका तत्वावरील शिक्षकांचीदेखील संपूर्ण नावांसह शिकवीत असलेला विषय, माध्यम, परीक्षक/नियामक टर्न, सेवानिवृत्ती दिनांक तसेच मोबाईल नंबर, बँक खाते क्रमांक व IFSC Code इ. माहिती नोंदवून नावासमोर संबंधितांची स्वाक्षरी घेण्यात यावी.**
3. यादीतील शिक्षकांची आपल्या क.महाविद्यालयातून अन्य क.महाविद्यालयात बदली झाली असेल अथवा अन्य क.महाविद्यालयातून बदलीने आपल्या क.महाविद्यालयात नियुक्ती झालेल्या अशा शिक्षकांच्या नावासमोर बदली क.महाविद्यालयाचे नाव व सांकेतांक लाल शाईच्या पेनने नोंदी कराव्यात.
4. एखादा शिक्षक एका पेक्षा अधिक विषय शिकवीत असेल तर कोणत्या विषयाचे पेपर तपासणीस हवेत ते ठळकपणे नमूद करावे.
5. एप्रिल २०२६ पूर्वी सेवानिवृत्त होणारे, विषय शिकवीत नसलेले तसेच अभ्यासमंडळ सदस्य, कॅन्सर/ हदयरोग /टी.बी. अशा आजाराने पिडीत असलेल्या शिक्षकांच्या नोंदी ठळकपणे करणे आणि त्यासंदर्भात आवश्यक पुरावा जोडणे अनिवार्य आहे.

6. यापूर्वी मुख्य नियामक (C.M.) म्हणून काम केलेल्या शिक्षकांनी त्यांची परीक्षक/नियामक म्हणून काम करण्याची तयारी दर्शविली असेल तर तसे त्यांच्या नावासमोर नोंद करावी. त्याचबरोबर एखाद्या शिक्षकांवर मंडळाकडून प्रतिबंधात्मक कारवाई केली गेली असल्यास तसा त्यांच्या नावांसमोर ठळक अक्षरात उल्लेख करण्यात यावा.

7. प्राचार्य प्रशासकीय कारणाने उत्तरपत्रिका तपासणीस नकार देतात, तथापि उत्तरपत्रिका तपासणीसाठी उपलब्ध शिक्षकांची संख्या विचारात घेता तसेच निकालाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण होणेच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार या सर्वांना परीक्षण/नियमनाचे काम करणे बंधनकारक राहिल.

8. प्रामुख्याने अंशतः अनुदानित/विनाअनुदानित क.महाविद्यालयांबाबत असे दिसून येते की, उत्तरपत्रिकांचे गठ्ठे तपासणीसाठी प्राप्त झाल्यानंतर ऐनवेळी संबंधित शिक्षक क.महाविद्यालय सोडून गेल्याचे सांगतात. ही बाब अत्यंत गंभीर असून अशावेळी उत्तरपत्रिका तपासून घेण्याची जबाबदारी सर्वस्वी प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

9. महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवा शर्ती) १९८१ नियम २२ [१] अनूसूची [अ] मधील ४ [१८,१९] नुसार सर्व शिक्षकांना मंडळाच्या परीक्षा अनुषंगिक सर्व कामे अनिवार्य आणि बंधनकारक आहे. तसेच जाणीवपूर्वक शिक्षक माहिती न पाठविणे / उत्तरपत्रिका न तपासणे/परत पाठविणे/अपूर्ण माहिती पाठविणे अशा सर्व घटनांबाबत सर्वस्वी जबाबदारी क. महाविद्यालयप्रमुख या नात्याने प्राचार्यांवर राहील.

**10.अनुदानित तसेच अंशतःअनुदानित/विनाअनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यीत क.महाविद्यालयातील सर्व शिक्षकांनी आपल्या नावासमोर योग्य त्या ठिकाणी Teacher Type बाबत ठळक अक्षरात तशी नोंद करावयाची आहे. (A/B/C/D पैकी)**

वरील सर्व सूचना तथा माहिती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे त्यांच्या नावांसमोर स्वाक्षरी घेण्यात यावी. वरीलप्रमाणे शिक्षकांची परीपूर्ण माहिती कोणत्याही परिस्थितीत **शनिवार दि.२७/०९/२०२५** रोजी आपल्या वितरण केंद्रावर जमा करावयाची आहे. **काही शाळा मुख्याध्यापक व क.महाविद्यालयाचे प्राचार्य ठराविक शिक्षकांची नांवे जाणीवपुर्वक वगळून यादी सादर करत असल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. यापुढे कार्यरत शिक्षकांची नांवे वगळल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्यांवर म.खा.शा.क. (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतुदीनुसार शिस्तभंग विषयी कारवाई प्रस्तावित केली जाईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

Digitally signed by
Subhash Rajaram Chougule
Date: 15-09-2025 13:34:11

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**सोबत:** विहित शिक्षक माहिती.

**प्रत माहितीस्तव:** सर्व वितरण केंद्रप्रमुख (सातारा/सांगली/कोल्हापूर जिल्हा) जमा झालेली स्वीकृती पत्रे तालुकानिहाय मंडळ कार्यालयात **मंगळवार दि. ३०/०९/२०२५** रोजी न चुकता जमा करावयाची आहेत.